I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 389-392
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# गावांचे आरोग्य आणि गांधी विचार

प्रा. जगदीश आर. चिमुरकर व डॉ. मंगेश अशोकराव रणदिवे

सहा. प्राध्यापक ( राज्यशास्त्र विभाग)
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर.
Corresponding Author : jagdishchimurkar23@gmail.com

| Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022<br>Accepted :25.03.2022 | Published: 01.04.2022 |
|---|---|---|

**संदर्भ :**

गांधीनी आदर्श राज्यांच्या संकल्पनेत ग्राम स्वराज्याला महत्त्वपुर्ण स्थान दिले. काळाच्या ओघात गावपातळीवर निर्माण झालेल्या समस्या व गावाला आलेले उकीरडयाचे स्वरूप नाहिसे करण्यासाठी गावाच्या स्वायत्ततेवर व स्वयंपुर्णतेवर गांधीनी ज्या प्रकारे बल दिला त्याचप्रमाणे गावाच्या पुनरघटनेचे पहिले पाऊल म्हणून त्यांनी गावाच्या आरोग्यरक्षणाचे महत्त्व प्रतिपादन केले व यात ग्रामसफाईला अग्रक्रम दिला. शरीर संपदेत, संपत्तीत आणि कार्यशक्तीत वाढ होण्यासाठी आरोग्यकारक स्वच्छता व राहणीकरणी याकडे विशेष लक्ष पुरवुन त्यांनी स्वच्छता ही बाब वैयक्तीक स्वार्थापलीकडे नेण्याचा प्रयत्न केला. अशातच सार्वजनीक आरोग्य व स्वच्छतेच्या बाबतीत त्यांना सरकारच्या आदेशापेक्षा लोकांचे मनापासून सहकार्य अपेक्षीत होते. गांधी निसर्गाला सर्वोत्कृष्ठ वैद्य मानतात. म्हणूनच ते गावातील आरोग्यविषयक काळजी घेतांना वैद्यकीय मदतीपेक्षा रोगप्रतीबंधक उपायावर अधिक भर देतात व पुढे कधीही आजारी न पडण्यासाठी लोकांना आरोग्य पालनाचे साधे नियम ठरविण्याचा सल्ला देतात. एकूणच गांधी गावकऱ्यांना स्वावलंबनाच्या मार्गाने जाण्यासाठी दिशा निर्देश करतात.

**बिजशब्द –** गाव, स्वावलंबन, ग्रामसफाई, ग्रामजीवन, सार्वजनिक आरोग्य, जबाबदारी, रोगप्रतिबंधक उपाय, निसर्गउपचार, आरोग्यपालन.

**प्रस्तावना:**

या पृथ्वीवर जन्मलेल्या एका महापुरूषाच्या मृत्युनंतर ६० वर्षांनी महात्मा गांधी विषयीची समाजाला असलेली जाणीव हळूहळू कमी होईल अशातऱ्हेचे जे वक्तव्य अलबर्ट आईनस्टाईन यांनी केले होते. त्याची प्रचीती आज येऊ लागलेली आहे. ते म्हणाले होते. अशी व्यक्ती कधीकाळी पृथ्वीवर अस्तित्वात होती. हेही लोक विसरून जातील. आज मानवता ही हृदयावरील प्रभावापासून दुर जात मेंदुवरील प्रभावाच्या दिशेने वाटचाल करीत आहे आणि हृदयापेक्षा मेंदुचा वापर स्वत:चे प्रश्न सोडविण्यासाठी करीत आहे. निरनिराळया वादांचा यांत्रिक पध्दतीमध्ये उपयोग करून जगाच्या रंगभूमिवर जो राजकीय खेळ सुरू आहे त्यामुळे माणसाचे रूपातंर मशीनमध्ये होत असून माणूस केवळ स्वहित जोपासण्याकडे लक्ष देत आहे. या स्वार्थी वृत्तीचा नाश व मानव समाजाच्या सर्वांगीन कल्याणासाठी गांधीनी वेळोवेळी सुचविलेल्या तसेच स्वत:च्या जीवनात त्याविषयक अमंलही केलेल्या विविध विषयांचे व त्यात अंतर्भुत असलेल्या गोष्टींचे अवलोकन करण्याची आज वेळ आलेली आहे.

गावाचे स्वावलंबन, स्वाश्रयी स्वरूप, गावाची स्वायत्तता, सामुहिक जीवन पध्दती, परोपकाराची भावना, इ. गावातील सकारात्मक बाबी काळाच्या ओघात नष्ट होऊन त्याच्या जागा वैयक्तिक स्वार्थ व गावाचे परावलंबन या नकारात्मक बाबीनी घेतलेली आहे. त्यांमुळे गावात दारिद्रय, बेकारी, कुपोषण, विषमता, अनारोग्य अशा विविध समस्या निर्माण होऊन गावाला उकीरडयाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. आज कुठल्याही 'समस्याचे माहेर घर' म्हणून प्रथम गावाकडे पाहिले जाते. ही स्थिती दुर करण्यासाठीच व गावाचे गतवैभव पुन्हा प्राप्त करून देण्यासाठीच गांधीनी ग्रामसेवेचे महान कार्य हाती घेतले होते. त्या अनुषगांनेच गांधीनी गावाच्या पुनररचनेचे कार्यक्रम आखलेले होते व त्यात गावाच्या पुनर्घटनेचे पहिले पाऊल म्हणून त्यांनी आरोग्य रक्षणांकडे लक्ष पुरविलेले आहे.

गांधीनी गावाचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्याकरीता त्यावर स्वच्छता हा अनेक महत्त्वपूर्ण पर्यायापैंकी एक पर्याय सुचविला. किबंहुना स्वच्छतेला ते आरोग्याची पहिली पायरी म्हणून संबोधतात. गांधी म्हणतात ''गावाच्या पुनर्घटनेत जर ग्रामीण सफाईचा समावेश केला नाही तर आमची गावे आज आहेत तशीच उकीरडयासारखी राहतील. गावची सफाई हा ग्रामजीवनाचा एक अंत्यत महत्त्वाचा भाग आहे आणि तो जितका महत्त्वाचा आहे. तितकाच अवघड आहे. दिर्घकाळची अस्वच्छता मुळापासून काढून टाकण्याला जबरदस्त पुरूषार्थाची गरज आहे. ज्या ग्रामसेवकाला गावची स्वच्छता करण्याच्या शास्त्राचे ज्ञान नाही, जो कुशल भंगी नाही, तो ग्रामसेवा करण्याला पात्र होणार नाही.''१ यासाठी गावाच्या स्वच्छतेची जबाबदारी गांधी गावातील प्रत्येक व्यक्तीवर सोपवितात. त्यातच ही

I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 389-392
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

जबाबदारी पार पाडत असतांना कुणी श्रेष्ठ व कनिष्ठ नाही असे ते सुचवितात. मुळात गावे ही घाणीची आणि अस्वच्छतेची साम्राज्ये झालेली आहेत. त्यामुळे खेडयांत बालमृत्यु व अपमृत्यु होत असतात. म्हणून खेडयातील स्वच्छता हे मोठे कार्य समजुन हया कार्यात गांधी भंग्याचा दर्जा आणि ब्राम्हणाचा दर्जा समान मानतात. अशाप्रकारे गावातील सर्व मंडळीनी स्वच्छतेच्या कार्यात सहभाग नोंदविला तर अनेक प्रकारचे आजार जे अस्वच्छतेमुळे आणि आरोग्यकारी सवयीच्या अभावामुळे उत्पन्न होतात त्यावर प्रतीबंध घालता येईल असे ते म्हणतात.

गांधीनी गावाच्या स्वच्छतेच्या संदर्भात आपले पहिले भाषण सार्वजनीक स्वरूपात १४ फ्रेबुवारी १९१६ मध्ये दिले होते जे एका मिशनरी सम्हेलनात आयोजीत करण्यात आलेले होते. त्यात त्यांनी 'गावातील स्वच्छतेच्या प्रश्नांचे निरसन हे फार अगोदरच करायला पाहिजे होते'२ असे मत प्रतिपादन केले. गांधीजी करीता स्वच्छता हा सर्वात मोठा आणि महत्त्वपुर्ण सामाजिक मुद्दा होता. त्यांनी कोणत्याही सभ्य आणि विकसीत मानव समाजाकरीता स्वच्छतेच्या उच्च आदर्शावर विशेष करून अधीक भर दिला. गांधीची ही स्वच्छताविषयक दृष्टी पाश्चिमात्य समाजातील पांरपारीक मिलाप व अनुभवातुन विकसीत झालेली होती. म्हणूनच गांधीनी आपल्या दक्षिण आफ्रीकेतील दिवसापासुन तर भारत देशातील आपल्या संपुर्ण आयुष्यात न थकता स्वच्छतेविषयी लोकांना जागृक करत राहीले. लोकसेवक संघाच्या संविधान मसुद्यामध्ये कार्यकर्त्या सबंधात गांधी लिहतात की, ''कार्य कर्त्यांना गावाची स्वच्छता अणि सफाई या विषयी जागृत केले पाहिजे आणि गावात पसरणाऱ्या प्रत्येक आजारांना आळा घालण्यासाठी आवश्यक ते पाऊल आपण उचलले पाहीजे.''३

आरोग्यकारक स्वच्छता आणि राहणीकरणी यांकडे योग्य तितके लक्ष पुरविल्याने शरीर संपदेत संपत्तीत आणि कार्यशक्तीत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे वाढ होत असते असे गांधीचे मत होते. गांधी म्हणतात. ''काही परदेशाच्या निरिक्षकांनी असा पुरावा दिला आहे की, पृथ्वी वरच्या सर्व देशात हिंदुस्थान हा व्यक्तीगत स्वच्छता पाळण्याच्या कार्यात बहूधा पहिल्या नबंरला येईल. पण मला वाटते, सामुहीक म्हणजेच गावच्या स्वच्छतेच्या बाबतीत असेच म्हणने शक्य होणार नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, आपण आपल्या कुटूंबाच्या स्वार्थापलीकडे फारशी प्रगती केलेली नाही.''४ गांधीनी याकरिताच स्वच्छता ही बाब वैयक्तीक स्वार्थापलिकडे नेण्याचा प्रयत्न केला. ज्याप्रमाणे कुटूंबातील माणसे आपले स्वत:चे घर स्वच्छ ठेवतात. त्याप्रमाणे हीच भावना शेजाऱ्याच्या घराबद्दल ठेवावी लागणार म्हणजेच आपल्या घरातील कचरा हा शेजारच्या अंगणात ढकलून चालणार नाही यावर गांधीचे कटाक्ष होते. म्हणूनच गांधी याविषयक कार्यात सामुहिक जबाबदारीच्या तत्वाचा अंगीकार करतात.

सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेच्या बाबतीत हे तेवढेच खरे आहे की, या कार्यात जर लोकांचे मनापासून सहकार्य लाभले तर त्या बाबतीत सरकारला फारसे काही करावे लागणार नाही. वैयक्तिक आणि सार्वजनिक आरोग्याची दक्षता बाळगणे हा सर्व शिक्षणाचा आरंभ असल्यामुळे सुशिक्षीत माणसे – विशेषत: वैद्यकीय व्यवसायातील लोक व विद्यार्थी जर हे काम खेडयात जाऊन मन:पुर्वक, बुध्दी योजून उत्साहाने आणि नियमीत पणाने करतील तर त्यांना हा प्रश्न यशस्वी रीतीने सोडविता येईल असे गांधीना वाटायचे. स्वच्छतेची सेवा ही व्यक्तीगत तशीच सामुहीक असल्यामुळे सेवेचे हे क्षेत्र काही मर्यादीत नसते. हे एकप्रकारे विस्तृत असे क्षेत्र असते. म्हणूनच गांधी म्हणतात की, स्वच्छता ही केवळ घराच्या आसपास किवा घरातच असून चालणार नाही तर स्वच्छता ही मनाचीही होणे गरजेचे आहे आणि आपल्या शेजारची सुध्दा. यासाठीच स्वच्छतेकरिता सर्वांना मिळून मिसळून काम करायला हवे.

गावातल्या लोकांना जे पुष्कळशा आजारांचा सामना करावा लागतो याचे कारण म्हणजे पाण्याचा साठा स्वच्छ ठेवण्याकडे तेथील लोकांचा झालेला दुर्लक्ष हे होय. गावातील तळी आज ही आंघोळीकरिता, कपडे धुण्याकरीता, पीण्याच्या व स्वयंपाकाच्या पाण्याकरिता अशी वाटेल त्या कामाकरिता वापरली जातात. पुष्कळ तळयांचा गुरेही वापर करतात. त्यातच म्हशी सूध्दा पुष्कळ वेळेला त्यात लोळत पडलेल्या दिसतात. असा एकूणच अनुभव असतांना गांधी म्हणूनच खेडयातील या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरवितात. ते म्हणतात की, ''खेडयातील तळी व विहीरी साफ करून त्या नेहमी स्वच्छ राहतील असे करणे आणि उकिरडे झाडुन साफ करणे. कार्यकर्ते जर हे काम स्वत:च करू लागतील, पगारी भंग्याप्रमाणे ते रोजच्या रोज कामाला लागतील आणि गावकऱ्यांनी या कामात सामील व्हावे अशी अपेक्षा आहे. शेवटी हे सर्व काम त्यांनीच स्वत: करायचे आहे. असे त्यांना नित्य जाणवून देत राहतील तर गावकरी आज ना उद्या सहभागी होतात असे त्यांना आढळल्या वाचुन राहणार नाही याची त्यांनी खात्री बाळगावी''.५

गांधी गावातील आरोग्यविषयक काळजी घेतांना वैद्यकीय मतदीपेक्षा रोगप्रतीबंधक उपायावर अधिक भर देतात. म्हणूनच ते आरोग्यकारी सफाई व राहणी यावर

लक्ष एकवटतात. खेडयात प्रवेश करून समोर जात असतांना तेथील रस्ते घाणीने भरलेले असतात. नाना तऱ्हेचे आजार त्यामुळे उद्‌भवत असतात. म्हणून ही घाण नाहीशी करून गाव स्वच्छ झाले तर त्यामुळे आजार सुध्दा त्यामानाने कमी झाल्याचे आढळून येईल असे गांधी म्हणतात. ''जर असे न करता गावात मोफत दवाखाना सुरू करून त्याला औषधाचे डोस दयायला सुरूवात केली तर या स्वच्छतेच्या क्षेत्रात पुढे पाऊल टाकताच येणार नाही व जोपर्यंत गावात स्वच्छता नांदणार नाही तोपर्यंत विविध आजारांना आमंत्रण मिळणे हे क्रमप्राप्त राहील. त्यासाठीच गांधी म्हणतात की, गावची स्वच्छता हे एकच खरोखर भरीव काम आहे. हे फार अवघड काम आहे. पण मी माझ्या सहकाऱ्यांना सोपी गोष्ट आणि स्वस्त प्रशंसा टाळा असे सांगणार आहे. आपण प्रथम आजाराला प्रतिबंध करण्याकडे लक्ष देऊ या, प्रत्यक्ष आजारावर उपाय आपल्याला मागाहून करता येईल.''६ एकूणच गांधी औषधापेक्षा रोगप्रतीबंधक उपयावर अधिक भर देतात. म्हणजेच एखादया रोगाचा उद्‌भव होण्यापुर्वीच त्यावर प्रतिबंधात्मक उपाय सुचवितात. म्हणूनच ते आजारावर इलाज करण्याला प्रथम प्राधान्य देतात. यात ते आजारावर इलाज करण्याचा अत्यंत परिणामकारक मार्ग म्हणून सफाईची निवड करतात.

गांधी हे निसर्गाला सर्वोत्कृष्ट वैद्य मानतात. मानसाने जे बिघडविले ते दुरूस्त करण्याचे काम निसर्ग करित असतो अशी त्यांची धारणा होती. म्हणून ते आजारावर इलाज करण्याकरिता निसर्गोपचाराचा मार्ग सुचवितात. त्यांच्या मते निसर्गोपचार म्हणजे जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीतच हितकारक बदल होय. अर्थात आरोग्याच्या नियमांना धरून आपली राहणी करणी नियमीत करणे असा त्याचा अर्थ होतो. या विषयक गांधी म्हणतात की, ''माझा निसर्गोपचार केवळ खेडयाकरीता आणि खेडयातील लोकांकरीता योजलेला आहे. म्हणून त्यात सुक्ष्मदर्शक यंत्र, क्षकिरण यंत्र अशा वस्तुना स्थान नाही. व्यक्तीगत आरोग्यपालन आणि आरोग्यपोषक राहणी – करणी यांना मुख्य महत्त्व आहे आणि तेवढी पुरेशी आहेत. प्रत्येकजण या कलेत निष्णात झाला तर आजाराचे नाव उरणार नाही आणि निसर्गाचे सर्व नियम पाळत असतांना आजार झाला तर त्यातून बरे होण्याकरिता सार्वभौम उपाय म्हणजे रामनाम हा आहे.''७

उपचार हे शक्य तितके स्वस्तात स्वस्त आणि साध्यात साधे असावेत असे गांधी म्हणतात. किबंहुना निसर्गोपचारात हेच अभिप्रेत असते. अशा तऱ्हेचाच उपचार खेडयात चालावा हे उद्दिष्ट ठेऊन गावच्या लोकांना आवश्यक ती साधनसामुग्री पुरविणे शक्य झाले पाहिजे. खेडयात जे मिळणार नाही तेवढेच बाहेरून आनावे असे त्यांचे मत होते. यातही समाजातील बहुतांश व्यक्तीचा सहभाग असणे गरजेचे आहे. कारण निसर्गोपचाराच्या माध्यमातून लोकांना आरोग्यपालन व रोगप्रतीबंधक उपाय व नियम सांगण्यावर कटाक्ष असतो म्हणून याबाबत गांधी म्हणतात की, ''खेडेगावच्या लोकांना वैद्यकीय मदत देण्याच्या कामी गावच्या शाळा मास्तरांचा उपयोग करून घेता येण्यासारखा आहे. त्यांनी आरोग्याच्या दृष्टीने सगळा गाव आपल्या अधिकार क्षेत्रात येतो असे मानावे आणि आरोग्यपालनाचे व रोगप्रतीबंधाचे साधे नियम गावच्या लोकांना शिकवावेत''.८

गांधी निसर्गोपचारांच्या अवलंबनातून गावकऱ्यांना स्वावलंबनाच्या मार्गाने जाण्यासाठी दिशा निर्देश करतात. कारण आरोग्यपालनाचे व रोगप्रतीबंधांचे धडे घेतलेली व्यक्ती ही आपल्या शरीरातून विष काढून टाकून स्वत:ला बरे करण्याची उपाययोजना करतो आणि पुढे कधी आजारी न पडण्याची खबरदारी घेतो. आरोग्य पालनाचे ज्ञान गावातील लोकांना जवळ जवळ नसल्या कारणांनेच गावाचे अरोग्य धोक्यात येत असते. यातच गावात स्वच्छतेचीही अतीशय वाईट स्थिती असते. म्हणून हे दोष जर दुर करता आले आणि लोकांनी आपल्या मनावर आरोग्य पालनाचे साधे नियम ठसवून घेतले तर त्यांना सोसावे लागणारे आजार जास्त प्रयत्न न करता किवा पैसा न गुंतविता नाहिसे करता येऊ शकते हे निश्चित.

**निष्कर्ष :**

गांधींनी वेळोवेळी दिलेल्या भाषणातून व स्वत: सिध्द् केलेल्या प्रयोगातून गावातील स्वच्छता, सफाई, गावाचे आरोग्य, गावाचे आहार, आरोग्य पालनाचे नियम व रोगप्रतीबंधक उपाय तसेच निसर्गोपचार इत्यादी विषयी मोलाचा संदेश दिलेला आहे. असे असतांना आज स्वातंत्र्य मिळुन ७२ वर्षाचा काळ लोटला तरी भारतामध्ये स्वच्छताविषयक बाबीचा कुठल्याही संर्वेक्षणाद्वारे आढावा घेतला तरी या स्वच्छतेचे चित्र निराशा जनक दिसून येईल. याचाच अर्थ आपण परत एकदा गांधीच्या प्रयोगाला अयशस्वी करण्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सहाय्य केले आहे असा होतो. गांधीनी समाजशास्त्राला अगोदर पुर्णता समजले आणि स्वच्छतेला अधिक महत्त्व दिले. अगदी सुरूवातीपासून स्वच्छतेच्या महत्त्वपुर्ण कार्यात ज्या लोकांनी पुढाकार घेतलेला आहे व त्यांचे हे प्रयत्न निरंतर चालु आहेत अशा लोकांना महत्त्वपुर्ण स्थान देण्याचा प्रयत्न गांधीनी आपल्या संपुर्ण आयुष्यात केला.

**संदर्भ :**

गांधी मो. क. मेरे सपनो का भारत, संग्राहक – प्रभु आर. के. नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १९६०

गांधी वाङ्मय, भाग –१३,पृष्ठ क्र. २२२

गांधी वाङ्मय, भाग –९०,पृष्ठ क्र. ५२८

गांधी मो. क. मेरे सपनो का भारत, संग्राहक – प्रभु आर. के. नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १९६० पृष्ठ क्र. १८

कित्ता, १९ ते २०

कित्ता, २१

कित्ता, २८

कित्ता, २७